**PROF. SAMBHAJIRAO KADAM COLLEGE, DEUR (Satara)**

**Criterion 7: Institutional Values and Best Practices**

**7.1.7 The Institution has disabled-friendly, barrier free environment**

## Provision for enquiry and information- Human assistance, reader, scribe, soft copies of reading material, screen reading

### University letter:


Estd: 1962
NAAC 'A' Grade

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: 0231-2609067, 2609068
GRAM: UNISHIVAJI FAX: 0091-0231-2690655
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
दूरध्वनी : 0231-2609067, 2609068 फॅक्स : 0091-0231-2690655
वेबसाईट : www.unishivaji.ac.in / e-mail : coe@unishivaji.ac.in


जा.क्र.: शिवाजी वि./पचमूमं कार्यालय/ 27 दिनांक : 8 FEB 2018

प्रति,

१. मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक
शिवाजी विद्यापीठ, पदवी आणि पदव्युत्तर अधिविभाग, दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. मा. प्राचार्य /संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

विषय:- उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या दि. ०४ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सोयी-सवलती देणेबाबत...

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन निर्णय कं. संकीर्ण/२०१९/प्र.कं.३०२/वि.शा.३ दि. ०४.०३.२०१७
२. परीक्षा विभागाचे परिपत्रक कं.शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/५५७, दि.१४.०३.०१७
३. व्यवस्थापन परिषदेचा दि. २२.०१.२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव
४. परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या दि. ०८.०१.२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव.

महोदय,

आपणांस ज्ञातच आहे की, उपरोक्त संदर्भांकित पत्र कं. १ प्रमाणे उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयातील / अधिविभागातील प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाने विविध सोयी सवलती देणेबाबत सर्व संबंधितांनी आवश्यक कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले आहेत. या अनुषंगाने उपरोक्त संदर्भांकित पत्र कं.२ मधील परीक्षा विभागाच्या पत्रानुसार शासनाच्या निर्णयामधील महाविद्यालय/अधिविभाग स्तरावरील अमंलबजावणी करण्याची सूचना दि. १४.०३.२०१७ रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आपणाकडून कार्यवाही सुरु असेलच विद्यापीठ स्तरावरील करावयाची कार्यवाही बाबत जसे- दंडक ओ-३१ मध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सैध्दांतिक/प्रात्यक्षिक सत्र कम उपस्थितीबद्दल दुरुस्ती होणे तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना दयावयाच्या ३ % गुणांबाबत परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेणे व त्या अनुषंगाने नवीन दंडक याबाबत धोरणात्मक कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक ०८.०१.२०१८ परीक्षा व मुल्यमापन मंडळाची बैठक व दि. २२.०१.२०१८ च्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार सुधारित दंडकाची उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरु आहे. अधिकार मंडळाने मान्य केल्याप्रमाणे .दि. ०४.०३.२०१७ च्या शासन निर्णयानुसार कमांक १ मधील अ ते ऊ मधील सर्व तरतूदी मान्य झाल्या असून त्याची अमंलबजावणी संस्था/ अधिविभाग स्तरावरुन करणेची आहे याची कृपया नोंद घ्यावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना तसेच तात्पुरते व्यंग आलेल्या विद्यार्थ्यांना लेखनिक देण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. त्याकरिता विद्यापीठाने विहित केलेल्या दिनांक ०७.०९.२००७ चे परिपत्रक कृपया अवलोकावे. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक पुरविला असल्यास सदर लेखनिकांचे मानधन रुपये १०० प्रति पेपर इतके देण्यात यावेत. सदरचा खर्च हा परीक्षा विभागाकडून मंजूर तसलमात मधून करुन त्याचे समायोजन करण्यात यावे. त्यामधील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत--

१. शक्यतो परीक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाळेचे असावेत.

२. उमेदवाराने स्वत:चा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहत नाही.

३. काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार पर्यवेक्षक यांना राहतील.

४. वेगवेगळ्या विषयाच्या पेपरसाठी एकापेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाही. मात्र वरीलप्रमाणे ( काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार वरिष्ठ पर्यवेक्षक यांना राहतील.) अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

५. सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेवर पी.डब्ल्यू.डी.असा शिक्का मुद्रित करुन त्या स्वतंत्र पध्दतीने आवेष्टीत करुन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार मुल्यमापित करण्यात याव्यात. पी.डब्ल्यू.डी. शिक्का परीक्षा विभागाकडून सर्व महाविद्यालये व अधिविभाग यांना पुरविण्यात येईल.

६. दिव्यांगाबाबत पुरविण्यात आलेल्या सोयी व सवलतीबाबत स्वतंत्र नोंदी कटाक्षाने ठेवण्यात याव्यात व आवश्यक्तेनुसार त्याबाबतची माहिती वेळोवेळी संबंधितांना कृपया दयावी.

दि. ०४.०३.२०१७ च्या शासन निर्णयामधील मधील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या २१ प्रकारच्या वर्गवारीनुसार ज्या सोयी सवलती देणेबाबतचे आदेश झाले आहेत. त्याचे तंतोतंत पालन कृपया करण्यात यावे. याबाबत शासनाकडून व इतर शिखर संस्था यांचेकडून प्राप्त होणा-या सूचनांबाबत वेळोवेळी आपणांस अवगत करणेत येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करताना दिव्यांग विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि क्षमतावृध्दी होणे तसेच सामाजिक जाणिव आणि जबाबदारीच्या दृष्टीकोनातून कृपया कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीकरिता मानार्थ अग्रेषित:-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई.
२. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सह सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
५. मा. प्र-कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.


- **Soft copies of reading material**

The access to following types of soft copies of the reading material/ academic e-Contents are made available to the students through library portal:

1. e-Content (PDF)
2. Audio Notes
3. Video Lectures
4. e-Subject Notes
5. Online Tests- Quiz
6. e- Question Papers
7. e-Syllabus
8. PPTs
9. e-Books
10. e-Journal Volumes
11. e-Reports
12. e-Newspapers

Students can access and download soft copies of the above reading material through the portal of college library:

https://sites.google.com/view/deurcollegelibrary/e-resources



दि . ०५ . ०९ . २०२१

# सूचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी पाठविलेल्या दि. ०८ फेब्रुवारी २०१८ च्या परीक्षा नियमावली परिपत्रकानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तसेच तात्पुरते व्यंग आलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने परीक्षा कालावधीत लेखनिक सोय उपलब्ध करून दिलेली आहे. तरी संबंधीत विद्यार्थ्यांनी दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र घेऊन परीक्षा विभागप्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

डॉ. बी. एन. भोसले
प्राचार्य,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा.